REGISTERED No. B 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।


—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ४ | पुणें, बुधवार; तारीख ६ जुलै, १९३८ | अंक २७



# किर्लोस्कर



२५ फुटांहून खोल विहिरीसाठी किर्लोस्कर हुगळी पंपाची कामगिरी लोकांना फारच पसंत पडली आहे.

कारखान्याचे प्रतिनिधी आपल्यास भेटतील, त्यांना आपली गरज कळवा. म्हणजे आपल्या उपयोगी पडेल अशा किर्लोस्कर पंपाची निवड ते करून देतील किंवा थेट कारखान्यास लिहा. म्हणजे सविस्तर माहिती दिली जाईल.

## हुगळी पंप

किर्लोस्कर हात व पावर पंपांचा सचित्र कॅटलॉग मागवा

**किर्लोस्कर बंधु, लि. : किर्लोस्करवाडी, सातारा**

---

**दे. भ. लोकनायक माधव श्रीहरी अणे** व नामांकित व्यवहारपटु डायरेक्टर असलेल्या एका सुप्रसिद्ध विमा कंपनीकरितां **महाराष्ट्र, कर्नाटक** आणि **गोमांतक** प्रांतांत विमा शास्त्राचा पूर्ण अनुभव असलेल्या गृहस्थांना भरपूर पगार व कमिशनवर नेमणें आहे.

## दि ग्रेट सोशल लाइफ ॲन्ड जनरल ॲशुअरन्स कं. लि.

**( हेड ऑफिस : जळगांव )**

माहिती मागवा

**चीफ ऑर्गनायझिंग ऑफिस, गणपती चौक, पुणें २**

# विविध माहिती

### टाटा आयर्न अॅन्ड स्टील कंपनी लि.

टाटा आयर्न अॅन्ड स्टील कंपनीच्या नोकरींत ४४ विदेशी लोक असून त्यांच्या मासिक पगाराची रकम ७७,७०० रुपये भरते. टाटा सन्स लि. कडे कंपनीची मॅनेजिंग एजन्सी आहे, तिला गेल्या २९ वर्षांत कमिशनचे रूपानें १ कोटि, २१½ लक्ष रुपये मिळाले. म्हणजे, वर्षाची सरासरी ४ लाखांवर पडते.

### दशवार्षिक शिरगणतीची पूर्वतयारी

१९४१ सालीं करावयाच्या शिरगणतीच्या पूर्वतयारीस प्रारंभ झाला आहे. प्रांतिक सरकारांनीं प्रांतानिहाय नेमावयाच्या अधिकाऱ्यांचीं नांवें सुचविलीं आहेत.

### गव्हाची साठवण करण्यास प्रोत्साहन

देशामध्यें धान्याचा पुरेसा साठा असणें हें युद्धाच्या पूर्वतयारीचें महत्त्वाचें अंग आहे. ह्या दृष्टीनें ब्रिटिश सरकार शेतकऱ्यांस गहूं साठवून ठेवण्यास प्रोत्साहन देत आहे. ह्या साठवणीमुळे त्यांचे भावांत उतार होऊन पुढें नुकसान झाल्यास सरकार तें भरून देणार आहे.

### मुंबई शहरांत दोषी तापाची साथ

टॉयफॉइड ह्या दोषी तापाचा मुंबई शहरांत सध्या बराच फैलाव झाला आहे. ह्या साथीस आळा घालण्यासाठी उपाय योजना आखण्याकरितां मुंबईतील डॉक्टरांची एक परिषद् भरली होती. त्यावेळीं, मुंबई म्युनिसिपॅलिटीच्या आरोग्य खात्याचे प्रमुख, डॉ. म्हात्रे, ह्यांनीं ह्या रोगाच्या उपसर्गासंबंधीं माहिती सांगितली. हिंदु वस्तींतील उच्च आणि मध्यम वर्गांत, विशेषतः गौड सारस्वत व प्रभु ज्ञातींत, टॉयफॉइडचा जोर विशेष दिसतो, असें ते म्हणाले.

### सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्स

सन १९३८ च्या नवीन विमा कायद्यास अनुसरून नेमलेले "सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्स" मि. जे. एच. टॉमस, हे गेल्या आठवड्यांत मुंबईस दाखल झाले.

### हिंदुस्थानांतील समाइक भांडवलाच्या मंडळ्या

१९१०-११ सालीं हिंदुस्थानांत एकूण २,३०४ समाइक भांडवलाच्या मंडळ्या अस्तित्वांत होत्या आणि त्यांचें भरणा झालेलें भांडवल ६४ कोटि रुपये होतें. १९२१-२२ सालीं ह्या कंपन्यांची संख्या ५,१८८ भरली आणि त्यांचें भरणा झालेलें भांडवल २ अब्ज, ३० कोटि रुपयांवर गेलें. १९३४-३५ सालीं एकूण ३ अब्ज,४ कोटि रुपये भांडवलाच्या ९,८४२ कंपन्या होत्या.

### रेलवेजच्या उत्पन्नांत वाढ नाहीं

बी. बी. अॅन्ड सी. आय. रेल्वेस चालू वर्षीं २० जून अखेर २ कोटि, ९० लक्ष रुपये उत्पन्न झालें. गेल्या वर्षाचा तत्सम आकडा २ कोटि, ९९ लक्ष रुपये, इतका होता. जी. आय. पी. रेल्वेस २० जून अखेर गेल्या सालीं ३ कोटि २९ लक्ष रुपये मिळाले होते; यंदाचे वर्षीं ३ कोटि, १५ लक्ष रुपये उत्पन्न झालें. रेलवेजच्या उत्पन्नांतील अपेक्षित वाढावा पदरीं पडत नाहीं, असें ह्यावरून दिसतें.

### मोटारींचें उत्पादन

१९३७ सालीं सर्वद् जगांत मिळून एकूण ६३ लक्ष, ३६ हजार मोटार गाड्यांचें उत्पादन झालें, त्यांपैकीं एकट्या अमेरिकेंत ७६ टक्के गाड्या तयार झाल्या. रशियामध्यें मागें मोटार गाड्या तयार होत नव्हत्या. १९३७ सालीं तेथें २ लक्ष गाड्यांचें उत्पादन झालें.

### नाशिक डि. सें. को. बँक बंद झाली

नाशिक जिल्हा सेंट्रल को. बँकेनें आपला व्यवहार तहकूब केला आहे. सहकारी खात्याच्या रजिस्ट्रारनीं बँकेचें रजिस्ट्रेशन रद्द केलें आहे, असें समजतें.

### ट्रेझरी बिलांवर १ रु. ० आ. ८ पै व्याजाचा दर

हिंदी रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत १ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा दर द. सा. द. शे. १ रु. ० आ. ८ पै इतका पडला.

### बॉंबे टेक्स्टाइल इन्क्वायरी कमिटीचे अध्यक्ष

मुंबई प्रांतांतील कापडाच्या गिरण्यांसंबंधीं चौकशी करण्याकरितां नेमलेल्या कमिटीचे अध्यक्ष, श्री. जयरामदास दौलतराम, ह्यांनीं प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें अध्यक्षाचें काम आपणांस ह्यापुढें करतां येणार नाहीं, असें सरकारास कळविलें आहे. त्यांचे जागीं नवीन अध्यक्ष लवकरच नेमण्यांत येईल.

### कराची शहराची जाहिरात

सिंध प्रांताकडे, विशेषतः कराची शहराकडे, प्रवासी आकर्षण्याची एक योजना कराची कॉर्पोरेशननें नेमलेल्या कमिटीनें आखली आहे. प्रवाशांस माहिती पुरविणाऱ्या ब्यूरोची स्थापना, कराची आणि सिंध ह्यांसंबंधी माहिती देणाऱ्या पुस्तकांचें प्रकाशन, पत्रकें, चित्रें, फिल्म्स इत्यादि प्रसिद्धीचे मार्ग कमिटीनें सुचविले आहेत.

### उंची

: उमेदवाराची उंची किमान ५ फूट, ८ इंच असल्याविना त्यास लंडन शहरांतील पोलिस खात्यांत प्रवेश मिळत नाहीं. इंग्रजाची सरासरी उंची ५ फूट, ७½ इंच; स्कॉचमनची ५ फूट, ८¾ इंच आणि आयरिशमनची ५ फूट, ८ इंच भरते. हजारांतील फक्त सात लोक ५ फूट, २ इंचापेक्षा कमी उंच असतात. महाराष्ट्रीय लोक ह्या मानानें किती खुजे आहेत!

### सामान्य लोकांकरितां मोटारगाडी

जर्मन हुकुमशहा, हेर हिटलर, ह्यानें एका मोटार कारखान्याचें नुकतेंच उद्घाटन केलें. ह्या कारखान्यांत तयार होणाऱ्या गाड्या प्रत्येकी हजार ते अकराशे रुपयांस विकल्या जातील. प्रत्येक गाडीची लांबी १३ फूट, ६ इंच; रुंदी ४ फूट ९ इंच आणि वजन १२ टन भरेल. एक गॅलन पेट्रोलवर ती ४० मैल जाईल आणि ताशीं ६२ मैल वेग घेईल.

### न्यू इंडिया विमा कं. लि.

न्यू इंडिया विमा कंपनीनें एप्रिल ते डिसेंबर, १९३८ ह्या नऊ महिन्यांच्या अवधींत १ कोटि १½ लक्ष रुपयांचे आयुर्विमे स्वीकारले. १९३७ च्या तत्सम मुदतींत कंपनीनें ८६½ लक्ष रुपयांचें काम पुरें केलें होतें. कंपनीचें वर्ष मार्चअखेर संपत असे, परंतु नवीन कायद्याप्रमाणें तें डिसेंबर अखेर पुरें करण्यासाठी नऊ महिन्यांचेच हिशेब केलेले आहेत.

### न्यू इंडिया विमा कंपनीच्या नोकरवर्गाचें हिंदीकरण

न्यू इंडिया विमा कंपनीचे जनरल मॅनेजर, मि. आर. जे. डफ, हे लवकरच सेवानिवृत्त होणार आहेत. कंपनीच्या स्थापनेपासून ते आज २० वर्षें कंपनीमध्यें काम करीत आहेत. कंपनीच्या नोकरवर्गाच्या हिंदीकरणाचे यत्न चालू असल्याविषयीं तिचे अध्यक्ष, सर चुनीलाल मेहता, ह्यांनीं कंपनीच्या साधारण सभेंत ग्वाही दिली.

### सोन्याची निर्गत

गेल्या आठवड्यांत मुंबई बंदरांतून ४४ लक्ष, ४३ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे सॉव्हरीन निर्गत झाले.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ३२६ |
| २ हिंदी अर्थकारण आणि ब्रिटिश राजकारण | ३२७ |
| ३ घसरलेला रुपया कसा सावरणार ! | ३२८ |
| ४ मध्यवर्ति सरकार विरुद्ध मध्यप्रांत सरकार | ३२८ |
| ५ स्फुट विचार ... ... | ३२९ |
| युरोपियन पटावर जर्मनीचा नवा डाव–स्वदेशी कागद आणि टारिफ-बोर्ड–कागदाचे ग्राहक आणि उत्पादक–शिक्षणाची वर्धा योजना–इंडियन प्रेमेसिव्ह इ. कं. लि. | |
| ६ त्रावणकोर बँक ... | ३३१ |
| ७ बेळगांव बँक लि. ... | ३३१ |
| ८ मुंबई सरकारचीं दोन नवीन बिलें | ३३२ |
| ९ वेस्टर्न इंडिया कंपनीची वार्षिक सभा | ३३३ |
| १० निवडक बाजारभाव | ३३५ |



# अर्थ

बुधवार, ता. ६ जुलै, १९३८


## हिंदी अर्थकारण आणि ब्रिटिश राजकारण

### हिंदी हुंडणावळीचा प्रश्न

हिंदुस्थानांतील अर्थकारणावर ब्रिटिश राजकीय सत्तेचें दडपण पडल्यामुळें तें येथील जनतेच्या हितास पोषक होईल अशा रीतीनें निश्चित होत नसल्याविषयींचें हिंदी पुढाऱ्यांचें गाऱ्हाणें अनेक वर्षांचें जुनें आहे आणि अजूनहि तें दूर होण्याचीं चिन्हें दिसत नाहींत. रेलवेजची व्यवस्था असो कीं लष्करी खात्याचा खर्च असो, व्यापारी करार असो कीं जकातीचा प्रश्न असो, आर्थिक दृष्टीनें इष्ट असलेलें धोरण अंमलांत येण्याच्या मार्गांत ब्रिटिश राष्ट्राची स्वार्थी राजकीय सत्ता आडवी येते असा नेहमीचा अनुभव आहे. हिंदुस्थान सरकारास वर्तन-स्वातंत्र्य नसल्यानें कित्येक प्रसंगीं ह्या प्रकरणांत त्यास नाइलाजानें साम्राज्य सरकाराची री ओढावी लागते. राजकीय दृष्ट्या त्यांस सोयीचें वाटणारें आर्थिक धोरण त्यांचेकडून ह्या देशावर लादण्यांत येतें, इतकेंच नव्हे तर त्याचें कसेंबसें लंगडें समर्थन करण्याचा प्रयत्नहि होत असतो, हा अनुभव प्रत्यही येत आहे. हिंदुस्थान सरकारचें चलनविषयक आणि हुंडणावळीविषयींचें परंपरागत धोरण ह्या अनुभवाचा उद्वेगजनक भाग आहे. गेलीं चाळीस वर्षें हिंदी पुढाऱ्यांनीं ह्या धोरणाविरुद्ध हाकाटी केली आहे आणि प्रचलित राजकारणांतला तो अत्यंत महत्वाचा आणि जिव्हाळ्याचा प्रश्न होऊन बसला आहे. जगांत आज आर्थिक देवघेवींच्या व्यवस्थेंत गोंधळ माजून राहिला आहे आणि त्यांत स्वतःचा व्यापार व उद्योगधंदे ह्यांचें बस्तान नीट बसवण्याची खटपट प्रत्येक राष्ट्र करीत आहे. हिंदुस्थान हा शेतीप्रधान देश असल्यानें त्याच्या कच्च्या मालाचें उत्पादन आणि विनिमय फायदेशीर कशीं होतील ह्याकडे लोकांचें लक्ष लागून रहाणें स्वाभाविक आहे आणि त्या दृष्टीनें हुंडणावळीचा दर परिस्थितीच्या सुधारणेस अनुकूल असावा अशी हिंदी लोकांची मागणी सरळ आहे. हुंडणावळीस हात न लावण्याचा आपला निश्चय राजकीय हेतूनें प्रेरित झाला नमून हिंदुस्थानचें आर्थिक हितच त्याच्या बुडाशीं आहे अशी त्यावर ब्रिटिश सरकाराची विचारसरणी आहे.

राजकीय सत्तेचें दडपण ह्या प्रश्नाविषयींच्या आर्थिक विचारावर पडत आहे ही गोष्ट "स्टेटिस्ट" ह्या प्रसिद्ध ब्रिटिश साप्ताहिकानें स्पष्टपणानें पुढें मांडली आहे हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. १८९७ सालापासूनची ही त्या पत्राची भूमिका आहे आणि हुंडणावळीच्या वादानें पुन्हां डोकें वर काढलें असतां तिला तें चिकटून राहिलें आहे. १८९९ सालीं झालेल्या चलनविषयक कायद्याचा उल्लेख करून तें पत्र गेल्या मेलनें इकडे आलेल्या आपल्या अंकांत म्हणतें:—"आम्हीं त्या वेळीं म्हटलें होतें (आणि आज तेंच आमचें मत कायम आहे) कीं हिंदुस्थान हा कृषिप्रधान देश असल्यानें आंतरराष्ट्रीय पैशाचा बाजार त्याच्या कक्षेंत येत नाहीं, एवढ्याकरितां रुपयाच्या हुंडणावळीचा दर कायद्यानें निश्चित न करतां देवघेवीच्या ओघांत स्थिर होण्यास तो मोकळा सोडून द्यावा. त्या वेळेप्रमाणें सध्याहि आर्थिक विचारांस गौणत्व येऊन राजकीय सत्तेचा पगडा ह्या विषयाच्या निर्णयावर बसला आहे." हिंदी शेतकरी वर्गाच्या हितापेक्षा लंडनला पैसे पाठवण्याच्या सोयीचें महत्व सरकारास अधिक वाटलें आहे. ब्रिटिश राज्यकर्त्यांची दृष्टीच संकुचित स्वार्थावर खिळलेली आहे. इंग्लंडच्या हितास प्राधान्य देणें आणि साम्राज्यांतल्या इतर देशांचे हितसंबंध गौण समजणें हा त्यांच्या धोरणाचा विशेष आहे. इंग्लंडच्या गाडीबरोबर इतरांस यात्रा करावयास लावणें ही मोठी चूक त्यांनीं आयर्लंडमध्यें करून भलताच परिणाम स्वतःवर ओढून आणला आणि त्या चुकीची पुनरावृत्ती हिंदुस्थानांत चालली आहे असें "स्टेटिस्ट" पत्रानें स्वच्छ म्हटलें आहे. ब्रिटिशांनीं ह्या देशांतल्या मूठभर लोकांस आपल्या पद्धतीचें शिक्षण देऊन त्यांच्या कर्तृत्वास वाव मात्र ठेवलेला नाहीं अशी त्याची तक्रार आहे. ब्रिटिश साम्राज्यांत हिंदी नागरिकांस मज्जाव करण्यांत येतो ह्या गोष्टीचाहि त्यानें उल्लेख केला आहे. हिंदुस्थानच्या विशिष्ट परिस्थितीस अनुसरूनच येथील सरकारचें हुंडणावळीचें धोरण आखलें गेलें पाहिजे आणि त्यांत ग्रेट ब्रिटनची सोय किंवा फायदा आहे म्हणून तें निश्चित होतां कामा नये हा सिद्धांत मांडण्यासाठी "स्टेटिस्ट"नें ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या धोरणाचा पाढा वाचला आहे. ब्रिटिश साम्राज्यांत इतर वर्णांच्या लोकांच्या मानानें श्वेतवर्णीय लोक थोडे आहेत तरी त्या सर्वांच्या संरक्षणाची जबाबदारी एकट्या इंग्लंडनें उचलली आहे आणि साम्राज्यांतल्या सर्व वर्णांच्या लोकांस त्यांत वाटेल तेथें जाऊन रहाण्याची मुभा असली पाहिजे ह्या दोन गोष्टींकडे त्यानें शेवटीं लक्ष वेधलें आहे. हिंदी लोकांच्या बाबतींत ह्या दुसऱ्या बाबीकडे ब्रिटिश राष्ट्र कानाडोळा करीत असून पहिलीवरच जोर देत आहे. हुंडणावळीच्या प्रश्नाचा निकाल हिंदुस्थानचें हित प्रामुख्यानें डोळ्यांपुढें ठेवूनच केला पाहिजे. परंतु "स्टेटिस्ट" नें म्हटल्याप्रमाणें आजवर असें घडलेलें नाहीं आणि आजहि हुंडणावळीचा प्रश्न उपस्थित झाला असून ब्रिटिश राजकीय दृष्टी हिंदुस्थानच्या आर्थिक गरजांपेक्षा अधिक प्रभावी ठरत आहे.

———

## घसरलेला रुपया कसा सावरणार ?

( १ )

दर रुपयास १७ ३१/३२ पेन्स ह्या दरानें रुपये घेऊन त्यांच्या मोबदल्यांत लंडनवर हुंडी देण्यास रिझर्व्ह बँक कायद्यानें बांधलेली आहे. हिंदी रुपयाचा ब्रिटिश पौंड स्टर्लिंगशीं निश्चित केलेला हा कायदेशीर संबंध आहे. ह्या प्रमाणांत रुपये घेऊन विलायती हुंड्या किंवा त्यांच्या किंमतीचें सोनें ग्राहकांस देतां यावें म्हणून लंडनमध्यें व हिंदुस्थानांत रिझर्व्ह बँकेनें निधी बाळगले आहेत. विलायतेवरच्या हुंड्यांचा पुरवठा बाजारांत सामान्यतः भरपूर असल्यानें ती बँक नेहमी खरेदीदार असते. परंतु अलीकडे ही परिस्थिति उलटी झाली आहे. येथें सरकारी रुपये घेऊन त्यास विलायतेंत पैसे पुरवण्यासाठी ती बाजारांत परदेशी हुंड्या विकत घेते आणि त्या लंडनमध्यें वटवून सेक्रेटरी ऑफ स्टेटला हिंदुस्थान सरकारच्या हिशेबी भरपाई करते. पण अलीकडे विलायतेवरच्या हुंड्यांचा बाजारांत तुटवडा होऊन आपल्या लंडनमधल्या निधीमधून बँकेस पैसा द्यावा लागत आहे. बँकेची बाजारांतली मागणी बंद झाल्याकारणानें व्यापाऱ्यांची विलायतेवरील हुंड्याबद्दलची गरज जेमतेम भागत आहे आणि त्या हुंडीचा दर उतरला आहे. आज कित्येक आठवडे हा दर १७ ३१/३२ पेन्सांच्या आसपास आहे. तो दोन-तीन पेन्सांनीं खालीं गेल्यास रिझर्व्ह बँकेस " उलट्या हुंड्या " विकून त्यास टेकू दिला पाहिजे आणि ग्राहकांची गरज पुरी केली पाहिजे.

जागतिक आर्थिक मंदीचें दुखणें बरें होण्याच्या मार्गावर असतां त्यानें अलीकडे उलट खाल्ली आहे. कच्च्या मालाच्या किंमती चोहोंकडे उतरल्या आहेत आणि हिंदुस्थानचा निर्गत व्यापार घटला आहे. निर्गतीच्या मानानें आयातीचें प्रमाण कमी न झाल्यानें हिंदुस्थानच्या " देण्या " पेक्षा " येणें " तुलनात्मक दृष्टीनें पहातां कमी झालें आहे. देण्याघेण्याची ही परिस्थिति खाली दिलेल्या तक्त्यांत स्पष्टपणानें प्रतिबिंबित झालेली दिसेलः—

माल आणि चांदी-सोन्याचा व्यापार
( आकडे दशलक्ष रुपयांचे आहेत )

| | मालाच्या आयातीपेक्षा निर्गत अधिक (+) कमी (-) | चांदी निर्गत + आयात − | सोनें निर्गत + आयात - | अखेरचा आढावा आयातीपेक्षा निर्गत अधिक + |
|---|---|---|---|---|
| १९३६— | | | | |
| तिसरी तिमाही | + १४३ | − २६ | + १९० | + ३०७ |
| चौथी " | + २०३ | − २९ | + ७१ | + २४५ |
| १९३७— | | | | |
| पहिली " | + १७८ | − ३९ | + ४२ | + १८१ |
| दुसरी " | + ७५ | − ९ | + ३४ | + १०० |
| तिसरी " | + ८१ | − १० | + ४९ | + १२९ |
| चौथी " | ... | ... | + ३९ | + ३९ |
| १९३८— | | | | |
| पहिली " | − २२ | + ४ दोन महिने | + ३४ | + २१ दोन महिने |

एप्रिल १९३७ चे पूर्वीच्या आकड्यांत ब्रह्मदेशाच्या व्यापाराचा अंतर्भाव आहे, त्यापुढें तो नाहीं, हें वरील कोष्टकाचें परिशीलन करतांना लक्षांत ठेवलें पाहिजे. तथापि, त्यामुळें आकड्यांवरून निघणाऱ्या सामान्य अनुमानास बाध येत नाहीं. निर्गतीमुळें उत्पन्न झालेलें हिंदुस्थानचें परराष्ट्रीय येणें कसें कमी कमी होऊन बहुतेक नाहींसें झालें आहे हें अखेरच्या आढाव्यावरून स्पष्ट होत आहे.

## मध्यवर्ती सरकार विरुद्ध मध्यप्रांत सरकार

### फेडरल कोर्टाच्या रजिस्ट्रारपुढील सुनावणी

मध्यप्रांत व वऱ्हाड कायदेमंडळानें त्या प्रांतांतील पेट्रोल आणि मोटारींचीं तेलें ह्यांच्या किरकोळ विक्रीवर कर बसविला. आपल्या अधिकारावर हें आक्रमण झालें असल्याची मध्यवर्ती सरकारनें फेडरल कोर्टाकडे तक्रार केली, त्याची पूर्व चौकशी १ जून रोजीं होऊन हिंदुस्थान सरकार व मध्यप्रांत सरकार ह्यांवर नोटीस बजावण्याचें ठरलें. तिला अनुसरून १ जुलै रोजीं फेडरल कोर्टाचे रजिस्ट्रारपुढें त्यांचे प्रतिनिधी हजर झाले. इतर प्रांतांचेंहि म्हणणें फेडरल कोर्टास ऐकून घ्यावयाचें असल्यानें त्यांचेहि ॲडव्होकेट जनरल हजर होते. ता. ८ ऑगस्ट पूर्वी हिंदुस्थान सरकारनें, ५ सप्टेंबरपूर्वी मध्यप्रांत सरकारनें व १९ सप्टेंबरपूर्वी इतर प्रांतिक सरकारांनीं आपलें म्हणणें कोर्टास सादर करावें, असें सर्वानुमतें ठरलें. ता. १७ ऑक्टोबर रोजीं फेडरल कोर्टापुढें काम चालू होईल.

## आयुष्याची अपेक्षा आणि नुकसानभरपाईची रक्कम

ग्रेट ब्रिटनमध्यें कांहीं दिवसांमागें तीन वर्षांचें एक मूल मोटारीखालीं चेंगरून दगावलें, तेव्हां त्याच्या बापानें नुकसानभरपाई मागितली. ह्या वयाच्या मुलग्याची आयुष्याची अपेक्षा ६१३ वर्षें असते, ह्या हिशेबानें त्यानें रकमेची मागणी केली. ज्यूरीनें १३,००० रुपये देवविले. जज्जास ही रकम फाजील वाटली; त्याचे मतें २,००० रुपये पुरे झाले असते. दुसऱ्या अशाच प्रकारच्या एका प्रकरणांत ज्यूरीनें २० हजार रुपये देवविले होते. आयुर्मर्यादेची अपेक्षा आणि अपघातामुळें होणारें नुकसान ह्यांचें सयुक्तिक परस्पर प्रमाण ठरवणें कठीण आहे.

### स्वदेशांत कारखाने काढा

"हिंदी लोकांनीं विदेशी माल येथें आणून विकण्याचा केवळ दलालीचा धंदा करून स्वस्थ न बसतां, स्वदेशांत मालाचें उत्पादन करण्याचा यत्न केला पाहिजे. त्यामुळें तरुणांतील बेकारीस बराच आळा बसूं शकेल "

—राष्ट्रसभेचे अध्यक्ष, श्री. सुभाषचंद्र बोस

पुण्यांत येणाऱ्या प्रवाशांसाठी भोजनाचें व उतरण्याचें निर्धास्त ठिकाण.

पूना
गेस्ट हाऊस
टेलिफोन नं. ७७९ : लक्ष्मी रोड—गणपति चौक—पुणें.

हवेशीर जागा
सुग्रास भोजन
उत्तम आदरातिथ्य

# स्फुट विचार

## युरोपिअन पटावर जर्मनीचा नवा डाव

इटली व जर्मनी ह्या राष्ट्रांचें संगनमत होऊन युरोपांत नवा प्रबळ संघ स्थापण्याचें त्यांनीं ठरविलें आहे, आणि त्यांस युरोपाबाहेरील जपानचा पाठिंबा मिळण्याचा पुष्कळ संभव आहे. जर्मनीनें ऑस्ट्रिया आत्मसात् करून आपलें आर्थिक बळ वाढवलें आहे आणि झेकोस्लोव्हेकियावर त्याचा ह्याच कारणानें डोळा आहे. महायुद्धांत गमावलेलें वर्चस्व पुन्हां मिळवण्याची जर्मनीची महत्त्वाकांक्षा आहे आणि इटलीसहि त्याच प्रकारच्या ध्येयाचें वेड लागल्यामुळें त्या दोन राष्ट्रांची गट्टी जमली आहे. इंग्लंड व फ्रान्स ह्या राष्ट्रांचें बळ बहुतांशीं त्यांच्या साम्राज्याच्या आर्थिक शक्तीवर अवलंबून असल्याच्या जाणीवेनें मध्ययुरोपांत आपलें आर्थिक साम्राज्य उभारण्याचा जर्मनी प्रयत्न करीत आहे. आल्बेनिया, हंगेरी, युगोस्लाव्हिया, बल्गेरिया, ग्रीस, डॅन्झिग ह्या चिमकुल्या राष्ट्रांशीं व्यापारी तह करून त्यांस संघाच्या जाळ्यांत अडकवून टाकावयाचें आणि कच्च्या-पक्क्या मालाच्या देवघेवींचें नियमन करून आपल्या सत्तेखालीं त्यांचा भक्कम गट बनवावयाचा ही जर्मनीची योजना आहे. व्यापाराच्या परस्पर सवलतींच्या साधनानें ह्या संघाची घटना दृढ करतां येईल अशी त्याची अपेक्षा आहे. जपान आणि जपानी वर्चस्वाखालील चीनचा भाग त्या संघास जोडण्यांत यावयाचा आहे. तुर्कस्तानांत रशिया व इंग्लंड ह्यांचें आर्थिक वजन असल्याकारणानें तेथें डाळ शिजण्याचा संभव दिसत नाहीं. तथापि, बाल्कन राष्ट्रांत इंग्लंडचा हात शिरूं नये आणि तेथें आपलें पूर्ण वर्चस्व असावें असा जर्मनीचा बेत आहे. युरोपच्या पटावर ह्याप्रमाणें जर्मनीनें नवा डाव टाकला आहे आणि स्पेनमध्येंहि त्याची व इटलीची धडपड चालली आहे, ती ह्या महत्त्वाकांक्षेस पोषक होईल अशी त्यांस आशा वाटत आहे.

---

## स्वदेशी कागद आणि टारिफ बोर्ड

स्वदेशी कागदाच्या धंद्यास हिंदुस्थान सरकारानें जकातीचें संरक्षण दिलें आहे. अधिक उत्पन्न करण्याच्या हेतूनें त्यांनीं जादा पट्टीहि बसवली होती, तिची अलीकडे बदललेल्या परिस्थितीच्या दृष्टीनें आवश्यकता आहे कीं काय ह्या विषयींची चौकशी टारिफ बोर्डाकडे सोपवण्यांत आली होती. त्या संबंधांत बोर्डानें केलेल्या शिफारसी आतां प्रसिद्ध झाल्या आहेत. बाहेरून येणाऱ्या कागदाच्या वर्गीकरणांत सरकारनें फेरबदल केल्यामुळें स्वदेशी धंद्यास मुळांत ठरविलेल्या संरक्षणाच्या प्रमाणापेक्षां अधिक सहाय होत असल्यानें, जादा पट्टी काढून टाकण्यास हरकत नसावी ह्या सूचनेचा विचार टारिफ बोर्डास करावयाचा होता. अलीकडे बाहेरून येणाऱ्या कागदाच्या किंमती चढल्या आहेत, त्या योगानें स्वदेशी कागदाच्या गिरण्यांस त्याची स्पर्धा कमी तीव्रतेनें भासणें स्वाभाविक आहे. तीन प्रमुख देशी गिरण्यांच्या मालकांच्या मतें, ह्याप्रमाणें किंमतीविषयींची परिस्थिती सुधारल्यानें जादा पट्टीच्या संरक्षणाची आवश्यकता राहिलेली नाहीं. दुसऱ्या दोन गिरण्यांचा अभिप्राय ह्याच्या विरुद्ध आहे. त्यांनीं लाकडाचा रांधा बाहेरून आणून तो जास्त प्रमाणांत वापरला आहे, तेव्हां जादा आयात पट्टी चालू रहावी ही त्यांची मागणी समर्थनीय नाहीं असें टारिफ बोर्डाचें म्हणणें आहे. गेल्या सात-आठ वर्षांत सर्वच देशी कागद-गिरण्यांचा उत्पादन खर्च कमी झाला आहे आणि ह्यामुळें त्यांस कूस उरत आहे. १९३०–३१ नंतर कांहीं वर्षे देशी मालाशी स्पर्धा करणाऱ्या विलायती कागदाच्या किंमती उतरल्या होत्या, त्या गेल्या सालीं पूर्व स्थळावर आल्या. त्यांत अलीकडे थोडासा उतार झाला असला तरी लाकडाचा रांधा बनवणाऱ्या परदेशी गिरण्यांनीं आपल्या किंमती चढीच्या ठेवण्याचें ठरवल्यानें ह्या बाबतींत स्पर्धेची फारशी भीति नाहीं. युरोपिअन मालापेक्षांहि स्वस्त भावानें जपानी कागद देशांत येण्याचा मात्र संभव आहे, आणि त्या बाबतींत दक्षता बाळगावी लागेल, असें टारिफ बोर्डानें म्हटलें आहे. परिस्थितीचा विचार करतां संरक्षक जकातीवरील जादा पट्टीची आवश्यकता नाहीं अशी त्याची शिफारस आहे.

---

## कागदाचे ग्राहक आणि उत्पादक ह्यांचे हितसंबंध

' हिंदुस्थानांत देशी कागदाच्या नव्या गिरण्या अलीकडे निघाल्या आहेत, त्यांस जादा पट्टीचेंहि संरक्षण हवें आहे. ह्या मागणीसंबंधानें टारिफ बोर्डाचें असें म्हणणें आहे कीं, त्यांच्या अगदी नव्या प्रकारच्या यंत्रांवर भरपूर उत्पादन होऊं लागलें म्हणजे खर्च कमी होऊन जादा संरक्षणाची आवश्यकता त्यांस भासणार नाहीं. कागद वापरणारांवर संरक्षणाचा बोजा किती पडावा आणि स्वदेशी धंद्यांच्या उत्कर्षासाठी कोणत्या मर्यादेपर्यंत तो जनतेवर लादणें वाजवी आहे ह्याचा विचार करणें महत्वाचें असतें. बोर्डाच्या मतें जादा पट्टीचें ओझें लोकांस यापुढें सहन करावयास लावणें समर्थनीय नाहीं. संरक्षण आज आहे तें तसेंच टिकणार आहे ह्या भ्रामक समजुतीनें नवीन कारखान्यांनीं देशाच्या जरूरीपेक्षा अधिक माल काढण्यांत त्यांचें आणि लोकांचें हित नाहीं असाहि शेरा बोर्डानें मारला आहे. ज्या जातींच्या कागदास संरक्षण मिळालें आहे त्यांसच अनुलक्षून बोर्डाचीं विधानें आहेत आणि इतर प्रकारांच्या मालास तीं लागू नाहींत हें उघड आहे. विशिष्ट प्रमाणांत विशिष्ट जातींच्या देशी कागदास संरक्षण आवश्यक असून त्याच्याशी स्पर्धा करणाऱ्या विलायती मालाची किंमत कोणत्याहि कारणानें उतरल्यास हिंदुस्थान सरकारास कायद्यानें अधिकार दिलेला आहे त्याचा तात्काळ उपयोग केला जाऊन संरक्षक जकात त्यांनीं चढवली पाहिजे अशी महत्वाची पुस्ती बोर्डानें आपल्या शिफारसींस जोडली आहे. विलायती रांधा स्वस्त होणें सर्वच देशी गिरण्यांच्या फायद्याचें होईल परंतु ह्या रांध्याची किंमत विशेष उतरल्यास देशी गिरण्यांत रांधा तयार होतो, त्यास स्पर्धेचा उपद्रव होईल. विलायती रांध्याची किंमत अलीकडे चढली आहे आणि देशी गिरण्यांचा उत्पादन खर्च उतरला आहे. ह्या स्थितींत दर टनास ११¾ रुपये ( म्हणजे संरक्षक जकातीवरची जादा पट्टी ) जकातींत कमी केल्यास चालण्यासारखें आहे असें टारिफ बोर्डानें ठरविलें आहे. मार्च, १९३९ च्या पुढें स्वदेशी कागदाच्या धंद्यास संरक्षण चालू ठेवावें कीं काय आणि तें किती असावें ह्या मूलभूत प्रश्नाची चौकशी होणार आहे त्यावेळीं ह्या बाबीचा विचार करणें सोयीचें होईल असें त्याचें म्हणणें आहे.

---

## शिक्षणाची वर्धा योजना

प्राथमिक शिक्षणाच्या प्रचलित पद्धतीस व्यावहारिक वळण लावून त्याचा मर्यादित खर्चांत झपाट्यानें प्रसार व्हावा ह्या हेतूनें महात्मा गांधी ह्यांच्या प्रेरणेनें वर्धा येथें स्थूल स्वरूपाची

एक योजना मान्य करण्यांत आली. तिची तपशीलवार मांडणी करण्याचें काम डॉ. झकीर हुसेन यांचेकडे सोंपवण्यांत आलें होतें. ह्या योजनेची चर्चा देशामध्यें पुष्कळ झाली आहे आणि तिच्यावर प्रतिकूल टीकाहि करण्यांत आली आहे. पुस्तकांचे ऐवजी हस्तव्यवसायाच्या मार्गानें मुलांमुलींस शिक्षण देणें आणि सध्यापेक्षा त्याचा खर्च कमी करून होतां होईल तों तें स्वावलंबी करणें ह्या दोन महत्त्वाच्या बाबी वर्धा योजनेंत मूलभूत आहेत. हस्तव्यवसायावरच विशेष भर दिल्यानें विद्यार्थ्यांची बौद्धिक वाढ होणार नाहीं आणि मुलांमुलींनीं हातांनीं तयार केलेल्या मालाच्या विक्रीमधून शिक्षणाचा खर्च काढूं पहाणें योग्य व इष्ट नाहीं हे दोन आक्षेप सदरहु योजनेच्या विरुद्ध घेण्यांत आले आहेत. या सर्व प्रश्नाचा विचार करण्यासाठीं मध्यवर्ती शिक्षण बोर्डानें एक लहान कमिटी नेमली होती आणि तिची सभा सिमला येथें गेल्या आठवड्यांत श्री. खेर, मुंबईचे मुख्य प्रधान, ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. सभेमध्यें डॉ. झकीर हुसेन ह्यांनीं आपल्या योजनेविषयीं पसरलेले गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न केला आणि तिच्यामध्यें जे दोन ठळक दोष आहेत असें सांगण्यांत येतें ते मुळांत अस्तित्वांतच नाहींत असें सांगितलें. सभेस त्यांचें म्हणणें पटून त्यांच्या योजनेंत कांहीं फेरफार सुचवण्यांत आले ते मान्य झाले असें कळतें. मुलांमुलींच्या भोंवतीं जी परिस्थिती असते आणि रहावयाची असते तिला धरून व्यावहारिक शिक्षण त्यांस मिळावें आणि त्या शिक्षणाचा बहुजन समाजाच्या जीवनांत खराखुरा उपयोग व्हावा हें वर्धा योजनेंतलें मूलभूत तत्त्व सर्वमान्य होण्यासारखें आहे. तसेंच, पिढीचा बौद्धिक व मानसिक विकास होण्यास पूर्ण सहायक होईल अशी तजवीज ह्या नव्या शिक्षणव्यवस्थेंत झाली मात्र पाहिजे. त्या विषयींची व्यवस्था शिक्षण तज्ञांच्या सल्ल्यानें वर्धा योजनेंत होत आहे, ही समाधानाची गोष्ट आहे.

---

### दि इंडियन प्रोग्रेसिव्ह इन्शुअरन्स कं. लि.

वरील कंपनीचा, ३१ डिसेंबर, १९३७ अखेरचा, दुसरा वार्षिक अहवाल आमचेकडे आला आहे. अहवालाचे वर्षी कंपनीस ३ लक्ष, ३ हजार रुपयांचें काम पुरें करतां आलें. गेल्या वर्षापेक्षा हा आकडा लहान असला, तरी असमाधानकारक नाहीं. कारण, नवीन विमा बिलानें सुचविलेल्या कडक योजनांमुळें नव्यानेंच स्थापन झालेल्या कंपन्यांस विम्याचें काम मिळणें कठीण जाणें स्वाभाविकच होतें. तथापि, इंडियन प्रोग्रेसिव्हनें ह्या अडचणीस तोंड देऊन प्रगतीचा मार्ग आक्रमण्यास प्रारंभ केला आहे ही समाधानाची गोष्ट आहे. कंपनीनें, रिझर्व्ह बँकेकडे कायद्यानें आवश्यक तितक्या किंमतीचे रोखे ठेवले असून, पुढील हप्ता भरण्यास तिला अडचण येणार नाहीं, असें दिसतें. अहवालाचे वर्षी कंपनीस एकूण २९,२९० रुपये उत्पन्न मिळालें. त्यांतून कंपनीनें ११¾ हजार रुपये विमाखातीं फंडांत टाकले. खर्चाचें एकूण हप्त्यांच्या मिळकतीशीं प्रमाण ६०·६९% पडलें. म्हणजे गेल्या वर्षापेक्षां, तें ३० टक्क्यांनीं कमी झालें. अहवालाचे सालीं कंपनीकडे एकहि क्लेम दाखल झाला नाहीं. कंपनीची व्यवस्था श्री. गाडगीळ व श्री. कलंत्रे ह्या दोघा उत्साही व अनुभवी तरुण सेक्रेटरींकडे असून, शेठ हणमंतराम रामनाथ व श्री. एच. जी. घारपुरे, आय. सी. एस. (रि.) हे कंपनीचे अनुक्रमें अध्यक्ष आणि उपाध्यक्ष आहेत. विमेदारांची निवड काळजीपूर्वक करण्याची दक्षता कंपनी घेत आहे. कंपनीची शीघ्र गतीनें प्रगति होत जाऊन तिला लवकरच उच्च दर्जा प्राप्त होईल, असा भरंवसा वाटतो.


# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. पुणें.

— कार्यक्रम —

**बारा लक्ष रुपयांची साखर तयार करून**

# शेअरवर नफा देणें.

**नवीन १२५० एकर उंसाची लागवड सुरू आहे.**

( १ ) यशाला मदत
( २ ) दरसाल ५½ टक्के व्याज
व
दोन वर्षांनीं डिपॉझिटची रक्कम परत.

दर सहामहिन्यांनीं व्याज वक्तशीर दिलें जातें व डिपॉझिटची रक्कम वक्तशीर रोख परत केली जाते.

**सविस्तर माहिती खालील पत्त्यावर मिळेल—**

२५७ बुधवार पेठ,
पुणें २.

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग एजंट

## त्रावणकोर नॅशनल अॅन्ड क्विलॉन बॅंक लि.

### रिझर्व्ह बॅंकेचा सल्ला आणि चौकशी

"त्रावणकोर नॅशनल अॅन्ड क्विलॉन बॅंकेजवळ रोख १५ लक्ष रुपये आहेत. सोनें, माल, रोखे इत्यादींत गुंतविलेले सुमारें ६० लक्ष रुपये पंधरा दिवसांत उभे करतां येतील. बॅंकेचें भरणा झालेलें भांडवल २५ लक्ष रुपये असून भागीदारांकडून २५ लक्ष रुपयांची रकम येणें ठेवलेली आहे. रिझर्व्ह फंडांत ५ लक्ष रुपये आहेत. बॅंकेच्या ८० शाखांपैकीं बहुतेक सर्व मद्रास प्रांतांत आहेत. सुमारें १,५०० लोकांस बॅंकेंत नोकरी आहे." वरील माहिती बॅंकेच्या जॉईंट मॅनेजिंग डायरेक्टरांनीं मद्रास हायकोर्टांत सांगितली.

*
* *

रिझर्व्ह बॅंकेचे डेप्युटी गव्हर्नर, श्री. मणीलाल बी. नानावटी, हे मद्रास येथें गेले व तेथील प्रधानमंडळाशीं त्यांनीं त्रावणकोर बॅंक बंद झाल्यामुळें उत्पन्न झालेल्या परिस्थितीसंबंधीं चर्चा केली. "बॅंक ऑफ हिंदुस्थान, इंडियन बॅंक आणि इंडो कमर्शिअल बॅंक ह्या तीन बॅंकांच्या चालकांनीं आपले कागदपत्र रिझर्व्ह बॅंके-कडून तपासून घेण्यास संमति दिली. ह्यामुळें जनतेंत विश्वास उत्पन्न होईल, अशी आशा आहे. शेड्यूल्ड बॅंकांस रिझर्व्ह बॅंक केव्हांहि सहाय करण्यास तयार आहे" असें पत्रक श्री. नानावटी ह्यांनीं ता. २७ रोजीं प्रसिद्ध केलें.

*
* *

त्रावणकोर नॅशनल अॅन्ड क्विलॉन बॅंकेच्या कोलंबो येथील शाखेकडून एकानें दागिन्यांच्या तारणावर कर्ज घेतलें होतें. हे दागिने परत मिळविण्याचे हेतूनें त्यानें ता. २६ जून रोजीं रात्रीं कोलंबो येथील शाखेंत चोरी करण्याचा यत्न केला, परंतु त्यास अटक करण्यांत आली.

*
* *

त्रावणकोर बॅंकेच्या ठिकठिकाणच्या भागीदारांनीं, ठेवीदारांनीं आणि हितचिंतकांनीं सभा भरवून बॅंक बंद करण्याविरुद्ध आपलें मत प्रदर्शित केलें आहे.

*
* *

त्रावणकोर बॅंकेचे व्यवहार बंद पडले, तरी त्रावणकोर संस्थानांतील इतर बॅंकांस धोका पोचण्याचें कारण नाहीं, असें संस्थानचे दिवाण सर सी. पी. रामस्वामी अय्यर ह्यांनीं जाहीर केलें आहे. बॅंकेच्या बाबतींत त्रावणकोर सरकारविरुद्ध करण्यांत आलेल्या तक्रारींत कांहीं तथ्य नाहीं, असें त्यांनीं सांगितलें.

*
* *

मुंबई हायकोर्टानें त्रावणकोर बॅंकेच्या मुंबई येथील शाखेस सील करण्याचा हुकूम दिल्यानंतर, ब्रिटिश हिंदुस्थानांतील तिच्या सर्व बॅंकांस सील ठोकण्यांत यावें, असा दुसरा अर्ज पुन: करण्यांत आला. बॅंकेच्या पुणें येथील दोन शाखा, कलकत्ता येथील दोन शाखा आणि दिल्ली येथील शाखा ह्यांस लिक्विडेटरनें सील करावें, असा हायकोर्टानें हुकूम दिला.

बॅंकेच्या शाखांपैकीं ४२ शाखा मद्रास प्रांतांत असून शेकडा ७५ इतकी रकम त्या प्रांतांत गुंतविण्यांत आलेली आहे, असें त्रावणकोर बॅंकेच्यातर्फे सांगण्यांत आलें, परंतु त्रावणकोर सरकारनें बॅंकेचा ताबा घेतल्यास ब्रिटिश हिंदुस्थानांतील लोकांचे पैसे वसूल होणें कठीण जाईल, असें अर्जदारांचें म्हणणें होतें.

*
* *

क्विलॉनच्या डिस्ट्रिक्ट जज्जानें बॅंकेची मालमत्ता ताब्यांत घेण्याकरितां लिक्विडेटर नेमला ह्याविरुद्ध त्रावणकोरच्या हायकोर्टाकडे अर्ज करण्यांत आला, तो नामंजूर केला गेला.

*
* *

आपल्या व्यवहाराविषयीं संपूर्ण चौकशी करण्याची रिझर्व्ह बॅंकेस मुभा देण्याविषयीं मद्रास सरकारनें त्रावणकोर बॅंकेस सूचना केली होती, ती तिनें मान्य केली आहे. बॅंकेच्या डायरेक्टरांनीं रिझर्व्ह बॅंकेकडे ह्याबाबत विनंति करावी, असें मद्रास सरकारनें तिला कळविलें होतें. रिझर्व्ह बॅंकेच्या सल्ल्यानुसार वागण्याचें डायरेक्टरांनीं कबूल केलें आहे.

*
* *

रिझर्व्ह बॅंकेचा सल्ला त्रावणकोर बॅंकेनें मान्य करण्याचें ठरविलें असून, बॅंकेच्या व्यवहारास पुन: केव्हां प्रारंभ होईल, हें मागाहून कळविण्यांत येईल, असें बॅंकेनें जाहीर केलें आहे.

*
* *

मि. बरकतअली ह्या ठेवीदारानें मद्रास हायकोर्टाकडे अर्ज करून बॅंकेची मालमत्ता ताब्यांत घेण्यासाठी तात्पुरता लिक्विडेटर नेमण्यांत यावा अशी मागणी केली होती. बॅंकेनें तिला प्रथम हरकत घेतली, परंतु अखेर बॅंक लिक्विडेटरच्या नेमणुकीस कबूल झाली. श्री. शास्त्री आणि श्री. शहा हे स्वत:च बॅंकेचे घेणेकरी असल्यानें, त्यांस लिक्विडेटर नेमण्यास हायकोर्टानें नकार दिला व मि. पेरी आणि मि. गिल ह्या दोघांची त्यानें नेमणूक केली. बॅंकेचा व्यवहार गुंडाळण्याविषयींची चौकशी ता. २८ जुलैपर्यंत पुढें ढकलण्यांत आली. वरील दोघां लिक्विडेटरांनीं रिझर्व्ह बॅंकेस तिच्या चौकशीच्या कामांत शक्य तें सहाय करावयाचें आहे.

*
* *

रिझर्व्ह बॅंकेनें मद्रास सरकारच्या विनंतीस मान देऊन त्रावणकोर बॅंकेसंबंधीं उपयुक्त सल्ला दिला ह्याबद्दल तिचे, विशेषत: तिचे डेप्युटी डायरेक्टर, श्री. नानावटी ह्यांचे, मद्रासच्या मुख्य मंत्र्यांनीं आभार मानले आहेत. रिझर्व्ह बॅंक त्रावणकोर बॅंकेच्या बाबतींत कायद्यानें शक्य तेवढें सहाय करील, असा विश्वास त्यांनीं प्रकट केला आहे.

### बेळगांव बॅंक लि., बेळगांव

वरील बॅंकेच्या, ३१ मार्च, १९३८ अखेरच्या आठव्या वार्षिक रिपोर्टावरून बॅंकेच्या प्रगतीची कल्पना येते. अहवालाचे वर्षी बॅंकेच्या भरणा झालेल्या भांडवलांत ११,१५० रुपयांची वाढ झालेली दिसते. ठेवीहि ६३½ हजारांनीं वाढून, त्यांची रकम ४ लक्ष, ८२ हजारांवर गेली आहे. वर्षअखेर सुमारें ५ लक्ष रुपये बॅंकेनें कर्जाऊ दिलेले आहेत. तिच्या रिझर्व्ह व इतर फंडांत मिळून सुमारें ९ हजार रुपये आहेत. बॅंकेनें १९३४–३५ ते १९३६–३७ ह्या तीन वर्षांत दरसाल द. शे. १० रुपये डिव्हिडंड दिलेलें आहे, परंतु चालू वर्षाच्या हिशेबांत ५ हजार रुपये काढून टाकावे लागले असल्यानें डिव्हिडंडचा दर ६¼% असावा, अशी डायरेक्टर बोर्डानें शिफारस केली आहे. सध्याच्या परिस्थितीकडे लक्ष देतां हा दर योग्यच आहे असें म्हटलें पाहिजे. बॅंकेस साल अखेर ४,६०३ नफा झाला आहे, त्यांतून ६¼% ह्या दरानें डिव्हिडंड देण्यास ३,४१० रुपये लागतील. हल्लींच्या मंदीच्या काळांत गंगाजळींत भर टाकून बॅंकेची मजबुती वाढवावी, तेवढी इष्टच होणार आहे. ह्या दृष्टीनें पहातां डायरेक्टरांनीं योजलेलें दक्षतेचें धोरण भागीदारांच्या आणि ठेवीदारांच्या अंतिम हिताचेंच आहे. ६¼% पेक्षांहि कमी दरानें डिव्हिडंड वाटलें तरी चालण्यासारखें आहे. कारण, प्रचलित व्याजाचे आणि डिव्हिडंडचे दर सर्वत्र उतरलेले आहेत.

## मुंबई सरकारचीं दोन नवीन बिलें

मुंबई प्रांतिक विधिमंडळाच्या नव्या घटनेंतील पहिल्या अधिवेशनांत कॉंग्रेस प्रधान मंडळानें आपला कार्यक्रम जाहीर केला, त्यावेळीं त्यानें शेतकऱ्यांच्या कर्जनिवारणाच्या प्रश्नाचा उल्लेख केला होता. सावकारांच्या व्यवहारांवर नियंत्रण, कर्जफेड तहकुबी, इत्यादि गोष्टी ह्या सरकारच्या कार्यक्रमांतील केवळ टप्पे असल्याचें त्यावेळीं सांगण्यांत आलें होतें. सारा आकारणीच्या पद्धतींत सुधारणा करण्याचा सरकारचा मानसहि अनेक वेळां जाहीर करण्यांत आला होता. विधिमंडळाच्या चालू बैठकींत हे प्रश्न विचारांत घेतले जाणार आहेत. त्यांपैकीं, कर्जनिवारणाच्या आणि जमीन-मालक व कुळें ह्यांच्या परस्पर संबंधाविषयींच्या बिलांतील योजनांचा अंदाज आतां प्रसिद्ध झाला आहे, त्यांवरून सरकारी धोरणाची स्थूल कल्पना येईल. शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा कमी करण्यापूर्वी तडजोड बोर्डामार्फत त्याची चौकशी केली जाईल अशी अपेक्षा होती; परंतु सरकारनें कर्जाच्या रकमेंत सरसकट एकदम ४० टक्के सूट देण्याचें ठरविलें आहे, असें कळतें. ज्यांनीं केवळ शेतीसाठीच कर्ज काढलेलें असून कर्जाचा बोजा ज्यांचा १५ हजारांचेवर नाहीं, अशा शेतकऱ्यांसच ही सवलत मिळावयाची आहे. कर्जाच्या रकमेचा हिशेब करून आणि त्यांत ४० टक्के कपात करून उरलेल्या ६० टक्के रकमेवरच सावकाराचा हक्क राहील. ह्या रकमेवर त्यास ६ टक्के दरानें व्याज घेतां येईल. परतफेडीची मुदत ठरवितांना प्रत्येक ऋणकोच्या सांपत्तिक स्थितीचा विचार केला जाईल. सरकारनें अगर सहकारी सोसायट्यांनीं दिलेल्या कर्जास वरील कायद्यांतील कलमें लागू नाहींत. कुळांस शेतीच्या फायद्यांत निश्चितपणानें अंशभागी करून त्यांच्या धंद्यांत स्थैर्य निर्माण करणें आणि त्यासाठी कुळांस आपली जमीन सोडून जाण्यास लावण्याचा जमीनदाराचा अधिकार मर्यादित करणें हा सरकारच्या दुसऱ्या बिलाचा हेतु आहे. जरी एकादी जमीन मालकानें दुसऱ्यास विकली, तरी नवीन मालकानें पहिल्याच खंडकऱ्याकडे जमीन करण्यास दिली पाहिजे, अशी सदरहु बिलांत तरतूद आहे. मात्र, जमिनीच्या विक्रीचे वेळीं हा खंडकरी पहिल्या मालकास ठरावाप्रमाणें खंड देत असला पाहिजे, ही त्यांतील अट पाळली गेली पाहिजे. खोत आणि खंडकरी ह्यांच्या हितसंबंधांचा मेळ घालण्याचें काम अत्यंत बिकट असून, ह्या प्रश्नावर विधिमंडळांत बरींच रणें माजण्याचा संभव आहे. कर्जनिवारणाच्या बिलांतील योजनेस विशेष विरोध झाला नाहीं, तरी पुरी चौकशी न करतां सवलतीचें प्रमाण मोघम सर्वांस सारखेंच ठरवून टाकणें इष्ट नाहीं, ह्या आक्षेपास सरकारास समाधानकारक उत्तर द्यावें लागेल.

### ॲबिसिनियावरील इटलीचा ताबा

ॲबिसिनियावरील इटलीचा ताबा तत्त्वतः नाहीं तरी व्यवहारांत सर्वांस संमत झाला आहे, असें राष्ट्रसंघाच्या २८ सभासद-राष्ट्रांच्या कृतीवरून स्पष्ट झालें आहे.

### जर्मन आणि ऑस्ट्रियन रोख्यांची खरेदी

जर्मन अगर ऑस्ट्रियन रोख्यांची खरेदी ह्यापुढें ज्यानें त्यानें आपल्या स्वतःचे जबाबदारीवर करावी, असें जर सर जॉन सायमन, ब्रिटिश फडनवीस, ह्यांनीं कॉमन्स सभेंत जाहीर केलें.

### भेसळ दूध, लोणी व तूप

१९३७ सालीं मुंबई कॉर्पोरेशननें दुधाचे ९,८३०, लोण्याचे १,०२५ व तुपाचे २,२८२ नमुने तपासले, त्यांपैकीं अनुक्रमें १,३८७, ४१ आणि १५१ नमुन्यांत भेसळ आढळली. तुपाच्या कित्येक नमुन्यांत भेसळीचें प्रमाण ९५ टक्क्यांहून अधिक सापडलें.




स्त्रियांचा आजार म्हणजे मुख्यतः विटाळदोष व गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध आर्डोमिक्स ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे याद्यीवरून तयार केलेलें असून आज सतत ६० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटी पोटांत कळा मारणें, ज्वर, कडकी, अकालीं गर्भपात, डोकें दुखणें शौच्यास साफ न होणें, इत्यादि, विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत.

किंमत बाटलीस ३ रुपये, टपालखर्च १२ आणे. एकदम ३ बाटल्या मागविणारास टपालखर्चासह फक्त ९ रुपये.

धी इंडो फॉरिन एजन्सीज. ( डि. नं. ६ )
२५३।३ माधवविलास, टिळकवाडी, पुणें २.

मराठी केन्द्र संस्था, पुणें

उन्हाळ्यानंतर १५ जून रोजीं सुरू झाली. यंदापासून मॅट्रिक नापास आणि नोकरी करूं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांकरितां बँकिंग आणि अकौंटन्सी या विषयांचे डिप्लोमा अभ्यासक्रम सुरू केले आहेत. शिक्षक वर्ग पदवीधर व अनुभवी असा असून परगांवचे विद्यार्थ्यांना वसतिगृहाची सुंदर सोय केली आहे. जास्त माहितीकरितां माहितीपत्रक मागवा.

आचार्य,
मराठी केन्द्र संस्था.
२९२ सदाशिव पेठ, पुणें.

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
V. G. & Sons
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

## वेस्टर्न इंडिया कंपनीची वार्षिक सभा

( ता. २६-६-३८ )

अध्यक्ष, श्री. अण्णासाहेब आपटे, ह्यांच्या भाषणांतील उतारे

कंपनीच्या प्रगतीसंबंधीं आकडेवार माहिती देऊन अध्यक्षांनीं नवीन उपक्रमांची हकीकत सांगितली. ते म्हणाले:—

### कंपनीच्या कारभाराची नवी योजना

"कंपनीची हल्लीची घटना सुमारें २४ वर्षांपूर्वी आर्टिकल्स ऑफ असोसिएशनमधील नियमांप्रमाणें तयार झाली असून तीच चालू आहे. सदरहु घटनात्मक नियमांप्रमाणें कंपनीचा कारभार पहिलीं १५-२० वर्षें यशस्वी रीतीनें चालूं शकला, परंतु त्यानंतरच्या काळांत कंपनीचा जसजसा व्याप वाढूं लागला तसतसा सदरहु नियमांत कंपनीच्या चोख कारभाराच्या व स्थैर्याच्या दृष्टीनें योग्य तो फेरबदल करणें इष्ट आहे असें वाटूं लागलें. गेलीं सुमारें ५-६ वर्षें प्रमुख शेअरहोल्डर्समध्यें घटनेंत काय फेरबदल करावे याबाबत वाटाघाटी चालू होत्या. सदरहु वाटाघाटींस गेल्या सालीं चांगलें मूर्त स्वरूप प्राप्त झालें. श्री. आण्णासाहेब चिरमुले यांनीं आपल्या कंपनीच्या कारभाराबाबतच्या २० वर्षांच्या अनुभवावरून घटनेंत कोणत्या दिशेनें फेरफार करावेत याबद्दलच्या त्यांच्या सूचना श्री. भाऊसाहेब सोमण व श्री. गणपतदास देवी यांचे संमतीनें सर्व शेअरहोल्डर्सपुढें स्पेशल सभा तारीख १३-२-३८ रोजीं बोलावून मांडल्या व त्या सदरहु सभेंत शेवटीं मंजूरहि झाल्या. या सुधारणा कोणत्या कारणांकरितां व कोणत्या हेतूनें करण्यांत आल्या आहेत हें आपणांस आतां विदित झालेंच आहे. यंदाचे सालीं नवीन नियमांप्रमाणें हल्लीचे डायरेक्टर्स व आतां नवीन निवडले जाणारे डायरेक्टर्स यांचें एक कौन्सिल तयार होईल व त्याकरितां आज शेअरहोल्डर्सतर्फे ४ उमेदवारांची निवड नवीन नियमांनुसार व्हावयाची आहे. त्याचप्रमाणें विमेदारांतर्फेहि २ नवीन डायरेक्टर्स निवडून यावयाचे आहेत व या सर्व १३ डायरेक्टरांनीं २ जागा कोऑप्शननें भरावयाच्या असून अशा रितीनें १५ डायरेक्टरांचें कौन्सिल तयार झालेवर सदरहु कौन्सिलकडून बोर्डावर ७ जणांची निवड होईल. या नव्या योजनेप्रमाणें कंपनीचा कारभार जास्त कार्यक्षम होऊन कंपनीस त्यामुळें चांगलें स्थैर्य प्राप्त होईल अशी आशा आहे."

### "वेस्टर्न इंडिया हाऊस"

"कंपनीची प्रसिद्धी व लौकिक अधिक वाढविण्याचे दृष्टीनें मोठमोठ्या शहरांमध्यें कंपनीच्या स्वतःच्या मालकीच्या इमारती असणें जरूर असून त्या धोरणानुसार मुंबईस सर फेरोजशहा मेथा रोडवर कंपनीनें ८६७ चौरस यार्डांचा एक प्लॉट खरेदी करून त्यावर भव्य इमारत बांधण्याचें काम सुरू असल्याचें मागील सालचे अहवालाचे वेळीं मीं सांगितलें होतें. त्याच वेळीं पुढील सालचे अहवालवाचनाचे अगोदरच इमारतीचें बांधकाम पुरें झालें असल्याचें सांगण्याची सुसंधि येईल अशी आशा प्रकट केली होती. सांगण्यास मला आनंद वाटतो कीं, मुंबईची सदर भव्य इमारत पुरी होऊन तिचा उद्घाटन समारंभ आमच्या कल्पनेबाहेर यशस्वी झाला हें सांगण्याची खरोखरच सुसंधि आज आली आहे."

( अपूर्ण )


# पाहिजेत.

आयुर्विम्याचें काम करण्यासाठीं सुशिक्षित, महत्त्वाकांक्षी व अनुभवी एजंट, ऑर्गनायझर्स व चीफ एजन्टस कांहीं प्रमुख ठिकाणीं नेमणें आहेत.

पगार, प्रवासखर्च व शिवाय भरपूर कमिशन. होतकरू व कर्तबगार लोकांस अमूल्य संधी. विशेष माहितीसाठीं पूर्वींचे प्रशस्तीपत्रासह लिहा अगर समक्ष भेटा.

सेक्रेटरी,

दि इंडियन प्रोग्रेसिव्ह इन्शुअरन्स कंपनी लि., पुणें नं. २.

## कित्येकांचीं पत्रें–

बॉंड खरेदीची तारीख उलटल्यावर आमचा बॉंड अर्ज स्वीकारावा व येत्या बक्षीस वांटणींत तो धरावा अशा आशयाचीं कित्येकांचीं पत्रें यावयाचीं हा गेल्या सालचा अनुभव यंदाही आला. अशांची निराशा होऊं नये म्हणून बॉंड खरेदीची ता. १५-७-३८ करण्यांत आलेली आहे तरी आमचे ग्राहक या वाढत्या मुदतीचा फायदा घेतील अशी आशा आहे.

दुसरी बक्षीस वांटणी ता. ३१-७-३८ रोजीं होईल.

स्पेशल ऑर्गनायझर:–टी. आर. अभंग, सातारा सिटी.

एजंट:–शंकर हरी साठे, मोटार स्टँड-सातारा.

महाराष्ट्र इन्शुअरन्स कंपनी लि. कऱ्हाड ( सातारा ).

INDUSTRIAL SOCIETY
## WORK SHOP

Furniture on Hire on Reasonable Terms

Any kind of plain or fancy Wooden and Iron Furniture can be made to order and delivered in the shortest possible time.

Old Furniture also can be bought or sold on commission.

SHEVAK BROS 153 Kasba, POONA Near Ganpati Temple

Branch No. 1—Fergusson Road.

## 'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँक आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

### आंतरराष्ट्रीय सहकारी दिन

जुलै महिन्यांतला पहिला शनिवार हा आंतरराष्ट्रीय सहकारी दिन असून तो पाळण्याची प्रथा पुण्याच्या सहकारी इंन्स्टिट्यूटनें चालू ठेवली आहे. त्याप्रमाणें गेल्या शनिवारीं हा दिन साजरा करण्यांत आला. त्याप्रसंगीं अनेक अधिकारी व बिन अधिकारी सहकारी कार्यकर्ते उपस्थित होते आणि कळकळीचीं भाषणें झालीं.

---

### मुंबई प्रांतांतील कामगार वर्ग

फॅक्टरी ॲक्टाखाली काम करणाऱ्या मजुरांची संख्या मुंबई प्रांतांत ३ लक्ष ७० हजार इतकी भरते. रेल्वेज, गोद्या, जहाजें, इत्यादींवरील कामगारांची संख्या त्यांत मिळवली, तर सुमारें ५ लक्ष कामगार मुंबई प्रांतांत सुनियंत्रित उद्योगधंद्यांत पोट भरीत आहेत. मजूर संघांची संख्या १९३६ सालीं ९९ होती आणि त्यांचे सभासद ८८ हजार होते. म्हणजे, ४ लक्षांहून अधिक मजूर कोणत्याहि ट्रेड युनियनला सामील झालेले नाहींत.

---

उत्कृष्ट सवलत ] व्यापारी [ सर्व सुखसोयी

## प्लॉट्स विकणेचे आहेत.

एम. एस. एम. रेल्वेचे बिचूद स्टेशन हें औंध संस्थानचे हद्दींत असून सरकार श्रीमंत बाळासाहेब महाराज पंतप्रतिनिधि, राजेसाहेब सं. औंध यांच्या प्रोत्साहनानें सदर स्टेशनवर व्यापारी वसाहत करणेंसाठीं प्लॉट्स पाडले आहेत. त्यांपैकीं बहुतेक प्लॉट्सची विक्री झाली असून फक्त व्यापारी लोकांकरितांच कराड तासगांव सडकेच्या दक्षिण बाजूस नवीन प्लॉट्स् पाडले आहेत त्यांची जाहीर लिलांवानें विक्री होणार आहे.

बिचूद स्टेशन हें साधारण मानानें कराड व सांगली यांचे मध्यावर असून आसपासच्या खेड्यांवरून बराचसा माल येथें येण्याची सोय आहे. घाटावरील माल येण्यासाठीं औंध सरकारकडून मुद्दाम घाटांतून उत्तमपैकीं सडक गाड्या येण्याजाण्यासारखी तयार करणेंत आली आहे.

वसाहतीवर व्यापाऱ्यांकरितां पोलीस बंदोबस्त, बँक, पोष्ट-ऑफिस, सरकारी शाळा वगैरेंची सोय करणेंत आली आहे. शिवाय तेथें उत्तम हवा व विपुल पाणी यांची नैसर्गिक सोय आहे. वसाहतीवर आठवड्याचा बाजार भरत असतो. अशा तऱ्हेनें व्यापारी वर्गास जरूर अशा सर्व सुखसोयी त्या ठिकाणीं आहेत.

अशा ठिकाणीं प्रत्येक व्यापाऱ्यास आपलें दुकान त्या वसाहतीवर असावें असेंच वाटेल. तेव्हां या आलेल्या संधीचा फायदा व्यापाऱ्यांनीं अवश्य घ्यावा अशी विनंति आहे.

या नवीन् प्लॉटसूची विक्री बिचूद वसाहतीवरील बँकेच्या ऑफिसांत तारीख २४ जुलै १९३८ इ. रोजीं दुपारीं ३ ते ५ चे दरम्यान राव ब. दिवाणसाहेब संस्थान औंध यांचेसमोर जाहीर लिलांवानें होणार आहे. वसाहत चौकशी कमेटीचे अध्यक्ष नामदार लक्ष्मणराव किर्लोस्कर हेही त्या ठिकाणीं उपस्थित होणार आहेत. तरी सर्व व्यापारी वर्गांनीं नेमले तारखेस नेमले वेळीं वसाहतीवरील बँकेच्या कचेरींत हजर रहावें अशी विनंति आहे.

लिलांवाच्या शर्ती कचेरीच्या वेळेंत, वसाहतीवर बँकेच्या ऑफिसांत, कुंडल येथें मामलेदार कचेरींत व औंध येथें दिवाण ऑफिसांत, पहाणेंस मिळतील.

शि. गो. दर्शने,
दिवाण सं. औंध.

औंध, तारीख १८।६।३८.


## जाहीर खबर

ज्यांची एजन्सी रद्द करण्यांत आलेली आहे अशा एजन्टाकडील हिशोब न मिळाल्यामुळें कर्जाची वाटणी ता. १८-७-३८ पर्यंत तहकूब करण्यांत आली आहे; तरी ता. ११-७-३८ पावेतों ज्यांना नवीन सर्टिफिकेटस् खरेदी करणें असेल त्यांना प्रवेश फी मध्यें रु. १ ची सवलत घेऊन रु. २३ मध्यें सर्टिफिकिटें घेतां येतील व ज्यांनीं पूर्ण पैसे भरले नसतील त्यांना ते भरून सर्टिफिकिटें मिळवितां येऊन कर्जाचा फायदाही घेतां येईल.

जनरल मॅनेजर

**दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी लि०**

हेड ऑफिसः–गिरगांव मुंबई, ब्रँचः–लक्ष्मी रोड, पुणें २.

---

**Invest and earn a decent margin of Cumulative Income.**

## THE SOUND BANKING CORPORATION LTD.

( Estd : 1935 )

*Head Office:—LAXMI ROAD, POONA.*

Pay Rs. 3/12/- and receive Rs. 5/- at the end of 5 years under the Cumulative Deposit Scheme with full freedom to pay and withdraw in between.

*For particulars, Apply to :—*

**Managing Agents.**

---

**Very useful for Central and Urban Co-operative Banks and Societies.**

## " URBAN BANKS "

BY

L. K. BHAGWAT,

*Chief Accountant,*

**Bombay Provincial Co-operative Bank, Ltd.**

The book written in English, besides fully describing the structure and functions of all types of Urban Banks, supplies practical hints to actual workers on the proper conduct of their day to day business including maintenance of accounts and records, cheques, endorsements, bills, audit, annual closing &c. **Principal Tannan** remarks in his foreword: "The book will show the reader the way to keep the co-operative house in the order expected of it." Price Rs. 2. Postage extra. Copies can be had from L. K. Bhagwat. Vincent Road, Plot No. 168 A, Dadar, Bombay 14.

## निवडक बाजारभाव

बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ... ३%

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) | ११७-१४ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन | १०३—७ |
| ४% १९४३ | १०८—६ |
| ३½% बिनमुदत | ९८-९½ |
| ३½% १९४७-५० | १०६—० |
| २¾% १९४८-५२ | १००—४ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | ११०—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) | १०९—८ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड ( ७० वर्षे मुदत ) | १०९—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३-६३ ) | ११२—४ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) | १२४—४ |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो. )

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) ११% | १३९-१२ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% | ११४—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% | ३१—४ |
| इंपीरिअल बँक ( ५०० ) १२% | १५८५—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ५% | ५८—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% | ११५—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड-बारामती ( १०० ) ४½% | १०२—० |
| पाचोरा-जामनेर ( १०० ) ४½% | ९६—४ |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १२½% | ९६०—० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% | ७२१-४ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% | १२४—८ |
| कराची ( १०० ) ९% | २१०—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% | १९६—४ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% | १३९०—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% | १४५५—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. | १५९—८ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००-५० ) २ रु. | ४०—० |
| शिंदिया स्टीम ( १५ ) १ रु. | २०—० |
| न्यू इंडिया विमा ( ७५-७५ ) १ रु. | ४१—४ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. | ४२५०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% | २१०—० |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. | १७१—० |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १० रु. | २५७—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ३६ रु. ३ आ. ६ पै | ११३२-८ |

#### सोनें-चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास | ३५-७-० |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळ्यास | ५०—४ |

अप-टु-डेट शिलाई करतां
महिंद्रकर ब्रदर्स यांचेकडे चौकशी करा
बुधवार चौक, पुणें   १२ तासांत कपडे शिवून मिळतील.   [ खादी भांडाराचे माडीवर

पराडकर टेलर्स अॅकॅडिमी
( सिटी पोस्टासमोर पुणें २ )
येथें शिवणकलेचें शास्त्रीय व व्यावहारिक धंदेशिक्षण फीसुद्धां सर्व खर्च मिळून फक्त ११० रु. त पूर्ण खात्री होईपर्यंत मिळतें.

आकडेशास्त्रज्ञांचें समाधान झालें !
आंकडेशास्त्रज्ञांनीं सर्व तऱ्हेनें हिशेब करून अखेर हीच पॉलिसी पसंत केली.
भरलेल्या हप्त्यावर शेंकडा ९ टके व्याज मिळून नफा व नगद ४०० रुपये प्रत्येक हजाराच्या पॉलिसीला देण्यांत येतात.
माहिती मागवा.
दि युनिव्हर्सल विमा कं. लि. चे महाराष्ट्राचे मुख्य एजंट्स : एम्. सूर्यराव अॅन्ड कं., लक्ष्मी रोड, पुणें २




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या
प्रतीचें अत्यंत लोकप्रिय

## झारापकर टेलरिंग कॉलेज

आप्पा बळवंत चौक, पुणें २

[ माहितीपत्रक मागवा ]

घरच्या घरीं संगीत कलेंत प्राविण्य मिळविण्यास
सर्वोत्कृष्ट-सचित्र-सुबोध-माहितीपूर्ण

## संगीत–मार्गदर्शक

मालेचीं पुस्तकें.

| गायन | हार्मोनियम | दिलरुबा | फिडल् |
|---|---|---|---|
| किं. ६ आ. | किं. २॥ रु. | किं. १ रु. २ आ. | किं. १ रु. ४ आ. |

व्ही. पी. नें चार आणे जास्त पडतील.

प्रभा संगीत विद्यालय, फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणें ४.

## सुप्रसिद्ध तुळजाराम मोदी

यांचे **पेढे व बर्फी** वापरा

मोती चौक : : : सातारा

## S. B. JOSHI & Co.

ENGINEERS & CONTRACTORS

| 41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City. |
|---|---|

## पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,

रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी.

एरोग्राफ प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.

भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२५ सदाशिव पेठ.

**'अभिनंदनीय प्रगति'** असेंच बोल नाशिकच्या सह्याद्रि विमा कंपनीबद्दल सर्वांच्या तोंडून निघत आहेत. किमान हप्ते, चोख व्यवस्था, वजनदार संचालक, कर्तबगार प्रतिनिधी व आकर्षक योजना वगैरे अनेक सर्वोत्तम गोष्टी याच संस्थेंत आहेत. पॉलिसी किंवा एजन्सी घेण्यापूर्वीं आमचा सल्ला घेण्यास चुकूं नका. ठिकठिकाणीं पगार व कमिशनवर प्रतिनिधि पाहिजेत.

लिहा अगर भेटा. | मॅनेजिंग डायरेक्टर

## ६ टक्के मासिक आंवक ठेव

डॉन ऑफ इंडियाच्या वरील योजनेप्रमाणें तारीख १-१०-३८चे आंत ठेव ठेवून फायदा मिळवा.

जनरल म्यानेजर–डॉन ऑफ इंडिया ला. इ. कं. लि. पुणें.

स्वतःचें मुलांना योग्य तऱ्हेनें शिक्षण देऊन

त्यांचे आयुष्यांतील पुढील मार्गाची योग्य रीतीनें कालक्रमणा करण्याची तरतूद करून ठेवणें हें प्रत्येक विचारवंत मातापितरांचें आद्य कर्तव्य होय. वरील प्रकारची सोय, उत्तम रीतीनें, फक्त " आयुर्विम्या "चे योगेंच साधतां येते.

## कॉमनवेल्थ विमा कंपनी लिमिटेड, पुणें.

ह्या सर्वश्रेष्ठ विमा संस्थेनें मुलांच्या शिक्षणाचे सोयीकरतां नवीन तऱ्हेचीं विद्यार्जनाचीं कोष्टकें सुरू केलीं आहेत.

ह्या बाबतींतील विशेष माहितीकरतां खालील पत्त्यावर लिहा.

रा. न. अभ्यंकर
बी. ए. एलएल. बी.
मॅनेजिंग एजंट.

## दि प्रॉव्हिन्शिअल बँक ऑफ अिण्डिया लिमिटेड

स्थापना १९३६

मुख्य कार्यालय : २२ / अ, हॉस्पिटल रोड, (सी. ॲण्ड. अेम् स्टेशन ) बंगलूर

शाखा : मुम्बअी, काळबादेवी, दादर, पुणें, पुणें-शहर, नाशिक, पांचगणी, सातारा, कऱ्हाड, सोलापूर, सुरत.

अध्यक्ष : खानसाहेब हाजी अहमद कासम, अेम. अेल. सी.

मॅ. डिरेक्टर : अेस्. पी. ठाकर.

**करण्ट डिपॉझिट अकाउण्टस् :** १०० रु. किंवा त्याहून अधिक रकमांनीं चालू होतात आणि दैनिक शिलकेवर दरसाल दरशेंकडा २ टक्के व्याज दिलें जातें.

**सेव्हिंग्ज डिपॉझिट अकाउण्टस् :** ५ रुपये आणि त्याहून अधिक रकमानिशीं चालू होतात आणि मासिक किमान शिलकेवर दरसाल दरशेंकडा ३ टक्के व्याज दिलें जातें. २०० रुपयापर्यंत कितीहि वेळा पैसे काढतां येतात. हा व्यवहार चेकनें करतां येतो.

**कायम मुदतीच्या ठेवी :** दीर्घकालीन आणि अल्पकालीन मुदतीच्या ठेवी सोयीस्कर अटीवर स्वीकारण्यांत येतात. ह्यासंबंधीची माहिती कार्यालयाकडून घ्यावी.

अनुमती मिळालेल्या कर्जरोख्यावर हातउसन्या रकमा मिळतात.

सर्व प्रकारचें बँकिंगचें कामकाज केलें जातें.

अधिक माहिती मागवावी.

| एम्. मोहन, एजंट, १७ मेनस्ट्रीट पुणें. | एच. जी. गद्रे, एजंट, लक्ष्मीरोड, पुणें. २ |
|---|---|


हें पत्र पुणें, पेठ मांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' मांबुर्डा, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.